दाखल तारीख : ३०/०४/२००२
नोंदणी तारीख : ३०/०४/२००२
निकाल तारीख : ०६/१०/२०१७.
कालावधी : १५ वर्ष, ०५ म, ०६ दि.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क.०१, नागपूर.**
**(पीठासीन अधिकारी इमरान आर.मरछीया )**

**नि.फौ.प्र.क.:-४९/२००२.** **नि.क.१५.**

महाराष्ट्र शासन,
मार्फत ठाणे अंमलदार,
पोलीस ठाणे गणेशपेठ, नागपूर **अभियोगपक्ष**

**-विरुद्ध-**

प्रशांत उर्फ भु-या जागोबाजी वानखेडे,
वय - ४५ वर्ष, धंदा - रिक्षा चालक,
रा. धम्म नगर झोपडपट्टी,
मध्यवर्ती बस स्थानक जवळ,
पो.स्टे गणेशपेठ, नागपुर. **आरोपी**

**विधीज्ञ** :- अभियोगपक्षाकरीता श्रीमती रामटेके, सरकारी वकील.
आरोपी करीता श्री.गोडे, वकील.

## - न्या य नि र्ण य -
## (दि.०६/१०/२०१७)

०१. आरोपी विरूध्द त्याने भारतीय दंड संहिताचे कलम ४६१ व ३८० चा गुन्हा केल्याचे आरोपाचा खटला चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे :-

तक्रारदार गुलाबराव नथ्थुजी सहारे याचा पान ठेला मॉडेल मिल चौक येथे आहे दि.६/४/२००२ रोजी सकाळी नेहमी प्रमाणे तक्रारदार त्याचा पान ठेला उघडण्याकरीता गेला असता त्याला दिसले की, पान ठेल्याचा लहान दरवाजा उघडलेला आहे. तेंव्हा पान ठेल्याची पाहणी केली असता त्याच्या लक्ष्यात आले की, पान ठेल्यातील डब्यात ठेवलेले रोख रूपये ५००/- ची चोरी झालेली आहे. सबब तक्रारदारने घटनेची तक्रार पोलीस ठाणे गणेशपेठ येथे दिली.

०३. तक्रारदाराने दि.७/४/२००२ रोजी दिलेल्या तक्रारच्या आधारे पोलीस ठाणे गणेशपेठ येथे गुन्हा क्र.८२/२००२ नोंदविण्यात आला व घटनेची चौकशी सुरू झाली. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा केला. दुस-या गुन्हयात पोलीस कोठडीत असतांना आरोपीने प्रस्तुत गुन्हयाची कबुली दिल्यामुळे त्याला अटक करण्यात आली व आरोपीने दिलेल्या कबुली निवेदनाच्या आधारे त्याच्या घरून चोरीच्या रक्कमे पैकी मिळालेले रूपये २००/- जप्त करण्यात आले. पुढील तपासात साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले व तपासाअंती आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

०४. आरोपी विरुध्द नि.क्र.-८ अन्वये आरोप निश्चित करण्यात आले व आरोपपत्रातील आरोप आरोपीला वाचुन व समजावून दाखविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही. प्रकरणात अभियोगपक्षाने तीन साक्षीदार तपासले. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यात आरोपी विरूध्द कोणताही पुरावा न आल्यामुळे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये त्याचे बयान नोंदविण्यात आले नाही.

०५. माझ्या विचारार्थ खालील मुदद् उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासह खालील प्रमाणे येत आहे:-

| **क्र** | **मुदद्** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, आरोपीने तक्रारदारचा बंद पान ठेला चोरी करण्याच्या उद्देशाने अप्रमाणीकपणाने फोडून उघडला ? | नाही |
| २ | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, आरोपीने तक्रारदारच्या पान ठेल्यातुन रोख रुपये ५००/- ची चोरी केली ? | नाही |
| ३ | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## - **का र ण मि मां सा** -

**<u>मुददा क्र.१ व २ साठी</u> :-**

०६. तक्रारदार गुलाब सहारे (सा.क्र.३) याने नि.क्र.१२ वर साक्ष देतांना सांगितले की, सन-२००२ साली मॉडेल मिल चौक येथे त्याचा पान ठेला होता. सन-२००२ साली रात्री त्याचा पान ठेला बंद असतांना त्याच्या पान ठेल्यात चोरी झाली होती. रात्री घटना घडल्यानंतर सकाळी जेंव्हा तो पान ठेल्यावर गेला तेंव्हा त्याच्या लक्ष्यात आले की, त्याच्या पान ठेल्यात चोरी झाली. त्याने पान ठेल्याच्या डब्यात ठेवलेले रू.५००/- चोरी झाले होते. त्याने चोरीची तक्रार नि.क्र.१३ पोलीसांना दिली होती. त्याच्या पान ठेल्यातुन पैश्याची चोरी कोणी केली होती, हे त्याला माहीत नाही. तो आरोपीला ओळखत नाही.

०७. अनील काळे (सा.क्र.१) याने नि.क्र.१० वर साक्ष देतांना सांगितले की, तो आरोपीला ओळखत नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही.

०८. प्रदीप बावने (सा.क्र.२) याने नि.क्र.११ वर साक्ष देतांना सांगितले की, तो तक्रारदारला ओळखत नाही. पोलीसांनी त्याला पंच म्हणुन बोलविले नाही. पोलीसांनी चोरी झालेल्या पान ठेल्याच्या ठिकाणी त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता.

०९. तक्रारदारच्या साक्षी आधारे सिध्द होते की, त्याचा बंद पान ठेला उघडुन कोणीतरी पान ठेल्यात ठेवलेले रोख रूपये ५००/- ची चोरी केली. परंतु झालेल्या चोरीत आरोपीचा सहभाग असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास समर्थन दिले नाही. अभियोगपक्ष तपासी अधिकारी यांची साक्ष घेण्यास अपयशी राहीला. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यात आरोपी विरूध्द कोणताही पुरावा आला नाही. आरोपी विरूध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी राहीला. करीता मी मुददा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुददा क.०३ साठी :-**

१०. आरोपी विरूध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी राहीला. करीता आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. अभियोगपक्षानुसार जप्त रोख रूपये २००/- तक्रारदारचे असल्यामुळे सदर रक्कम तक्रारदारला देण्याचे आदेशीत करणे न्यायोचित होईल. तरी मुदद्या क्र.३ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

१. आरोपीने भारतीय दंड संहिताचे कलम ४६१ व ३८० चे गुन्हा केल्याचे आरोपातुन त्याची फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जमानती बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपील कालावधी नंतर जप्त रोख रूपये २००/- तक्रारदार गुलाबराव नथ्युजी सहारे यास परत करण्यात यावे.

नागपूर.
दि.०६/१०/२०१७.

(इमरान आर मरछीया)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.०१),नागपूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file of Judgment are word to word, as per original judgment.

Name of Stenographer : V.N.Sawaimoon. (L.G.)